## निवडक

### पाकने पीएसएलचे सामने कराचीत हलविले

**कराची, दि. ८ :** भारताने केलेल्या हवाई हल्ल्याचा धसका पाकिस्तानने घेतला आहे. आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल) च्या दहाव्या हंगामातील उर्वरित सर्व सामने कराचीत हलवण्याचा निर्णय घेतला आहे. पाकिस्तान सुपर लीग ही स्पर्धा महत्त्वाच्या टप्प्यावर असून, संभाव्य सुरक्षेच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे पीसीबीने म्हटले आहे. सर्वांशी सल्लामसलत करून कराचीत उर्वरित सामने खेळवण्याचे ठरवले आहे. या निर्णयामुळे आज रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमवर होणारा कराची किंग्ज आणि पेशावर झल्मी यांच्यातील २७ वा सामना रद्द करण्यात आला असून, तो कराचीत नव्याने नियोजित केला जाणार आहे. 'पीएसएल'चा अंतिम सामना १८ मे रोजी खेळला जाणार आहे.

---

### चेन्नईचा केकेआरवर २ गड्यांनी विजय

**चेन्नई, दि. ८ :** आयपीएल २०२५ मधून बाहेर झालेल्या चेन्नई सुपर किंग्स संघाने केकेआरचा २ विकेट्सने पराभव करत कोलकाताला जवळपास स्पर्धेतून बाहेर केले आहे. चेन्नईचा पराभवाचा सिलसिला थांबवत अखेरीस विजय नोंदवला आहे. चेन्नईच्या या विजयाचे हिरो नूर अहमद आणि डेवाल्ड ब्रेविस ठरले. केकेआरने दिलेल्या १८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरूवात खूपच खराब झाली. चेन्नईचे दोन्ही सलामीवीर आयुष म्हात्रे आणि डेव्हॉन कॉन्वे डकवर बाद झाले. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या उर्विल पटेलने वादळी सुरूवात केली. उर्विल पटेल ११ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३१ धावांची झटपट खेळी करत बाद झाला. याशिवाय डेवाल्ड ब्रेविसने पहिलं अर्धशतक झळकावत शानदार खेळी केली. ब्रेविसने वैभव अरोराच्या एका षटकात चौकार-षटकारांचा पाऊस पाडत ३० धावा कुटल्या. यासह ब्रेविसने २५ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५२ धावांची खेळी केली. ब्रेविसनंतर धोनी आणि शिवम दुबेने ४३ धावांची सावध भागीदारी करत संघाला विजय मिळवून देण्यात भूमिका बजावली. शिवम दुबेचे अर्धशतक हुकले असले तरी त्याने ४० चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ४५ धावा केल्या. तर धोनीने एका षटकारासह १७ धावांची खेळी केली. तर अंशुल कंबोजने एक चौकारासह संघाला दोन चेंडू शिल्लक ठेवत विजय मिळवून दिला. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजीला उतरलेल्या केकेआरची सुरूवातही खराब झाली. दुसऱ्या षटकात पहिली विकेट गमावल्यानंतर, सुनील नरेन आणि कर्णधार अजिंक्य रहाणे यांनी एक मजबूत भागीदारी रचली आणि संघाचा डाव सावरला. संघाने झटपट १०३ धावांपर्यंत आणखी ३ विकेट गमावल्या. दरम्यान आंद्रे रसेल आला आणि त्याने काही मोठे फटके खेळून संघाला १७९ धावांच्या सामन्याच्या योग्य धावसंख्येपर्यंत पोहोचवले.

# लखनौसाठी आज 'जिंका किंवा मरा'

## आरसीबीचे असणार आव्हान | लखनौसाठी विराट कोहली डोकेदुखी ठरण्याची शक्यता

**लखनौ, दि. ८ :**

इंडियन प्रिमिअर लीगचा (आयपीएल) लीग टप्पा आता अंतिम फेरीत असून लवकरच प्लेऑफचे चित्र देखील स्पष्ट होईल. या हंगामातील ५९ वा सामना शुक्रवार, उद्या ९ मे रोजी भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७.३० वाजता लखनौच्या एकाना स्टेडियमवर खेळला जाणार आहे. ११ पैकी ६ सामने गमावलेले लखनौ सुपर जायंट्स उद्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी सामना करणार आहे. प्लेऑफ फेरीत गाठायची असल्यास लखनौ सुपर जायंट्स हा सामना 'करो या मरो' असा आहे. तर दुसरीकडे, गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर असलेला आरसीबीचा नॉकआउटमध्ये आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करेल.

आरसीबीचा विजय प्लेऑफमध्ये स्थान निश्चित करेल आणि त्यांचे एकूण गुण १८ होतील. आरसीबीने कोलकाता, चेन्नई, मुंबई, राजस्थान, पंजाब आणि दिल्लीसारख्या कठीण मैदानांवर त्यांनी विजय मिळवला आहे.



लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार रिषभ पंत त्याच्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. त्याने या हंगामात २५८ धावा केल्या आहेत आणि मोठे फटके खेळण्यात तो पारंगत आहे. पण आरसीबीचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड (१२ बळी) त्याच्या मार्गात आव्हान निर्माण करू शकतो. हेझलवूडच्या अचूक टप्प्यातील माऱ्यामुळे अनेक फलंदाजांना त्रास झाला आहे. पंतने हेझलवूडविरुद्ध २३ चेंडूत २८ धावा केल्या आहेत पण एकदा तो बादही झाला आहे. पॉवरप्ले आणि मधल्या षटकांमध्ये ही लढाई निर्णायक ठरू शकते.

लखनौ सुपर जायंट्सचा स्फोटक फलंदाज निकोलस पूरन (३३५ धावा) डेथ ओव्हर्समध्ये गेम चेंजर आहे. त्याची वेगवान फलंदाजी आरसीबीसाठी धोकदायक ठरू शकते. दुसरीकडे, आरसीबीच्या यश दयालने या हंगामात आपल्या हुशार गोलंदाजीने फलंदाजांना गोंधळात टाकले आहे. दयालविरुद्ध पूरनने १३ चेंडूत २२ धावा केल्या आहेत पण तो अद्याप बाद झालेला नाही. ही लढत डेथ ओव्हर्समध्ये होईल जिथे पूरन मोठी धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न करेल आणि दयाल धावा रोखण्याचा प्रयत्न करेल.

लखनौ सुपर जायंट्सचा फिरकी गोलंदाज रवी बिश्नोई (१० बळी) एकाना येथील संथ खेळपट्टीवर आरसीबीचा अनुभवी फलंदाज विराट कोहली (४४६ धावा) याला रोखण्याचा प्रयत्न करेल. कोहलीची फिरकी गोलंदाजी करण्याची क्षमता सर्वांनाच माहिती आहे, परंतु बिश्नोईच्या वेगवान आणि हुशार गोलंदाजीने अनेक फलंदाजांना त्रास दिला आहे. कोहलीने बिश्नोईविरुद्ध २६ चेंडूत ३७ धावा केल्या आहेत पण एकदा तो बादही झाला आहे. मधल्या षटकांमधील ही लढाई सामन्याचा मार्ग ठरवू शकते कारण बिश्नोई कोहलीला लवकर बाद करण्याचा प्रयत्न करेल.

लखनौ सुपर जायंट्स या हंगामात त्यांच्या घरच्या मैदानावर शानदार कामगिरी करत आहेत, तर आरसीबीचा फॉर्म आणि कोहलीची फलंदाजी त्यांना प्रबळ दावेदार बनवते. या खेळाडूंच्या संघर्षांमध्ये केवळ तंत्राची लढाई नसेल तर ती रणनीती आणि संयमाचीही परीक्षा घेईल.

हा सामना चाहत्यांसाठी उत्साहाचा दुहेरी डोस घेऊन येईल. पंत, पूरन आणि बिश्नोई लखनौ सुपर जायंट्सला विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतील, तर हेझलवूड, दयाल आणि कोहली आरसीबीला विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतील. या खेळाडूंमधील लढाई या सामन्याला आयपीएल २०२५ चा एक संस्मरणीय क्षण बनवू शकते.

### संभाव्य प्रतिस्पर्धी संघ

**लखनौ सुपर जायंट्स :** मिचेल मार्श, एडन मार्कराम, निकोलस पूरन, रिषभ पंत (यष्टीरक्षक), आयुष बडोनी, डेव्हिड मिलर, अब्दुल समद, आवेश खान, मयंक यादव, प्रिन्स यादव, दिग्वेश राठी, रवी बिश्नोई.

---

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू :** जेकब बेथेल, विराट कोहली, मयंक अग्रवाल/मनोज भंडागे, रजत पाटीदार (कर्णधार ), रोमॅरियो शेफर्ड, जितेश शर्मा (विकेटकीपर), टिम डेव्हिड, कृणाल पांड्या, भुवनेश्वर कुमार, सुयश शर्मा, जोश हेझलवुड / लुंगी एनगिडी, यश दयाल.

# ॲथलेटिक्स स्पर्धेत भूमिका उच्च माध्यमिकला विजेतेपद



**साखळी : राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे विजेतेपद पटकावलेल्या संघाचा गौरव करताना प्राचार्य यशवंत सावंत. सोबत उपप्राचार्य रावसाहेब राणे व इतर शिक्षकवर्ग.**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. ८ :** गोवा क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत पर्ये-सत्तरी येथील श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाने मुलांच्या गटाने विजेतेपद प्राप्त केले. राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेत प्रथमच मुलांच्या या संघाने अजिंक्यपद पटकावले. रोहान खान याने १०० मीटर धावणे, उंच उडी, लांब उडी या प्रकारांमध्ये वैयक्तिक सुवर्णपदकांसह सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार पटकाविला. अनुराग गावस लांब उडी रौप्यपदक प्राप्त झाले.

मुलांच्या रिले संघाला ४ ÷ १०० मीटर रिलेमध्ये सुवर्णपदक (रोहान खान, कृतेश खरवत, अनुराग गावस, एकनाथ हिंदे), कु. धर्मराज गावस १०० मीटर धावणेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. या सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षक अमोल वझे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य यशवंत सावंत, उपप्राचार्य रावसाहेब राणे, श्री भूमिका शिक्षण संस्था, श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक या सगळ्यांच्या वतीने शारीरिक शिक्षण शिक्षक अमोल वझे व सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# खेळाडूने जिद्द बाळगल्यास खेळात प्रगती निश्चित

## मंत्री गोविंद गावडे | सावईवेरेत फ्लडलाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. ८ :** खेळाडूने शिस्त, जिद्द, चिकाटी, सातत्य व सकारात्मक वृत्ती अंगी बाळगल्यास खेळात प्रगती करीत प्रत्येक खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक प्राप्त करतील. खेळाडूंमध्ये देशाभिमान व देशप्रेम अत्यंत महत्त्वाचे असते, असे कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी सांगितले.

सावईवेरे येथील मोरेश्वर स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लबतर्फे अखिल गोवा पातळीवर आयोजित केलेल्या आमदार गोविंद गावडे चषक फ्लडलाईट वॉर्ड वाइज हेवी टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सावईवेरे येथील पंचायत मैदानावर झालेल्या या सोहळ्यास व्यासपीठावर गोविंद गावडेसह जिल्हा पंचायत सदस्य श्रमेश भोसले, सरपंच शोभा पेरणी, पंचसदस्य नवनाथ वेलकासकर व क्लबचे अध्यक्ष प्रमोद बांदोडकर उपस्थित होते.



**सावईवेरे : फ्लडलाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन करताना मंत्री गोविंद गावडे. बाजूला श्रमेश भोसले, शोभा पेरणी ,नवनाथ वेलकासकर व प्रमोद बांदोडकर.**

मंत्री गावडे म्हणाले की, गोमंतकातील खेळाडूंमध्ये नकारात्मक वृत्ती असून तेवढी गांभीर्यता नसल्याने खेळाडूंची प्रगती खुंटते. आज गोमंतकात अनेक संस्था लाखो रुपयांच्या क्रिकेट स्पर्धा आयोजित करून खेळाडूंना संधी देत असते. परंतु राष्ट्रीय य व आंतरराष्ट्रीय पातळीवर गोव्यातील किती खेळाडू तयार होतात हा प्रश्नचिन्हच आहे. मोरेश्वर क्लब हा केवळ क्रीडा क्षेत्रातच नव्हे तर सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातही कार्यरत असल्याने व या संस्थेची स्वतःची वास्तू असल्याने क्लबच्या सदस्यांमध्ये असलेला एकसंघ व आत्मविश्वासाचे मंत्र्यानी कौतुक केले.यावेळी श्रमेश भोसले व शोभा पेरणी यांनीही विचार मांडले.

सर्वप्रथम उमेश गावणेकर यांनी प्रास्ताविक केले. स्वागत व पाहुण्यांची ओळख प्रमोद बांदोडकर यांनी केली. यानंतर गोविंद गावडे यांच्या हस्ते चषकांचे अनावरण करण्यात आले. सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी पहलगाममध्ये दहशतवाद्यांकडून ठार झालेल्या भारतीयांना व शिरगाव जत्रेत मृत्युमुखी पडलेल्या गोमंतकीयांना तसेच क्लबचे सदस्य उल्हास सतरकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सूत्रनिवेदन व आभारप्रदर्शन उमेश गावणेकर यांनी केले.

# धावण्याच्या स्पर्धेत सोनू कुमार, आराध्य प्रथम

## इंडियन रेड क्रॉस सोसायटी बार्देश शाखा व फिटनेस फ्रीक्सतर्फे आयोजन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. ८ :** आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस दिनाच्या निमित्ताने इंडियन रेड क्रॉस सोसायटी बार्देश शाखा व फिटनेस फ्रीक्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ५ कि. मी. धावण्याच्या स्पर्धेत पुरुष गटात पुरुषोत्तम वालावालकर उच्च माध्यमिक विद्यालयाचा सोनू कुमार याने प्रथम क्रमांक पटकाविला. दुसरा व तिसरा क्रमांक अनुक्रमे कुशे उच्च माध्यमिक विद्यालयाचा शंकर कुशवाह व सेंट ब्रिटो हायस्कूलच्या सहर्ष परबने प्राप्त केला.




**म्हापसा : धावण्याच्या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसोबत सदानंद शेटतानावडे, प्रा सुभाष कवठणकर, सलीम इसानी, मेहबूब विराणी व इतर**

महिला गटात पहिला व दुसरा क्रमांक सेंट अँथनी हायस्कूल धुळेरच्या आराध्य नायक व हंसिका चिक्के यांनी पटकावला तर तिसरा क्रमांक आरसीसी पेडे येथील सींद्रेला पवार यांना मिळाला. विजेत्या स्पर्धकांना पदके प्रमुख पाहुणे राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी इंडियन रेड क्रॉस सोसायटी बार्देश शाखेचे अध्यक्ष प्रा. सुभाष कवठणकर, रेड क्रॉस सोसायटी गोवाचे व्यवस्थापकीय सदस्य सलीम इसानी, खजिनदार मेहबूब विराणी, उपसचिव नुरोद्दीन शेख, सदस्य डॉ. प्रदीप कोरगावकर उपस्थित होते.

सकाळी ६:३० वा झेंडा दाखवून पेडे क्रीडा संकुलातून स्पर्धेला सुरवात करण्यात आली होती. स्पर्धेत एकूण १६८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्वागत व आभार प्रदर्शन प्रा. सुभाष कवठणकर यांनी केले तर गिरिश सावंत व सिद्धेश फराज यांनी सूत्रसंचालन केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. नीता कवठणकर, विष्णू मांद्रेकर, परमानंद अमोणकर, फिटनेस फ्रीक्सचे सतीश गावंडळकर, गिरीश पावसकर, पवनकुमार, शिवप्रकाश गावस व इतर सदस्यांनी सहकार्य केले.




**कुडचिरे : येथे धनगर प्रिमीयर लिग - २०२५ चषकाचे अनावरण करताना ॲड. अजय प्रभुगांवकर. सोबत समिती अध्यक्ष व लाटंबार्से पंचायत पंच दिलीप वरक व समिती सदस्य.**

# कुडचिरेत धनगर प्रिमीयर लीग २०२५ चषकाचे अनावरण

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. ८ :** गोमंतक धनगर समाजोन्नती मंडळ डिचोली तालुका समिती आयोजित धनगर प्रिमीयर लिग-२०२५ स्पर्धेच्या च्या चषकाचे अनावरण व खेळाडू लिलाव करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन श्री म्हालची पांढर मंदिर, धनगरवाडा - कुडचिरे येथे संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजित कार्यकर्ते तथा सम्राट क्लब मयेचे अध्यक्ष ॲड. अजय प्रभुगावकर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन सुरुवात केली. उपस्थित सर्व संघमालक, समितीचे अध्यक्ष व लाटंबार्से पंचायत पंच दिलीप वरक यांनी स्वागत करताना सर्व संघमालकांचे अभिनंदन केले. ॲड. प्रभुगावकर यांनी मार्गदर्शन करताना समाजाने एकत्र राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने खेळाडू व समाजबांधव उपस्थित होते. सूत्रसंचलन सचिव उमेश शिंगाडी व शैलेश वरक यांनी आभार मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २४६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 246 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .